
# भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

संपादक
डॉ. ज्ञानोबा मुंढे



Bhartiya Swatantryacha Amrut Mahotsav

Dr. Dnyanoba Venkatrao Mundhe

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

डॉ. ज्ञानोबा व्यंकटराव मुंढे

मु.पो. डोंगरशेळकी ता. उदगीर जि. लातूर

पिन- ४१३५१७ Email.-rpdvmunde@gmail.com

मो. ९९२३६४७६२१ / ८७८८५७६२५७

© सर्व हक्क संपादकाधिन.

**प्रकाशक :**

वेदिका प्रकाशन

पत्की निवास, धनगर बावडी,

हावगीस्वामी मठ, उदगीर, जि. लातूर

पिन.-४१३५१७ मो. ९७३०७०६१६०

**प्रथमावृत्ती : ५ मे २०२४**

**ISBN : 978-81-971594-0-4**

**मुद्रक :**

भारती मुद्रणालय, ई-वार्ड-८३२,

मेनरोड चौथी गल्ली, शाहूपूरी, कोल्हापूर

पिन - ४१६०००१ (महाराष्ट्र)

**स्वागत मूल्य : ४००/- रूपये**

***नोट :** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या संपादित पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकाची असून त्यासंबंधी प्रकाशन, मुद्रक, संपादक व वितरक सहमत असतीलच असे नव्हे.

# अनुक्रमणिका


☐ १. चिंतन भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे .................................... १४
- डॉ. भागिरथी गिरी

☐ २. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे सिंहावलोकन ..............................१७
- प्राचार्य धनाजी राजे

☐ ३. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव थोडी खुशी थोडा गम.................................. २०
- प्रा. डॉ. रामकृष्ण बदने

☐ ४. स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि सामाजिक-आर्थिक न्यायाची घसरण. ! ..... २४
- प्रा. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

☐ ५. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव काय कमावले? काय गमावले? ................ ३०
- श्रीमती. रेशमा शेख

☐ ६. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव : एक दृष्टीक्षेप ............................ ३४
- डॉ. सतिश सातपुते

☐ ७. स्वातंत्र्याच्या प्रकाशात डोंबारी समाजात अंधार ................................. ३८
- प्रा. डॉ. शिवाजीराव देवनाळे

☐ ८. स्वातंत्र्याची फलश्रृती ............................................................... ४२
- प्रा. अजित खरोसे

☐ ९. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे आम्ही साक्षीदार .............................. ४८
- प्रा. रामदास केदार

☐ १०. भारताच्या स्वातंत्र्याने काय कमावले? काय गमावले? .......................... ५०
- श्रीमती अंजली स्वामी

☐ ११. भारतीय स्वातंत्र्यात मुस्लिमांचे योगदान आणि आजची परिस्थिती ....... ५५
- श्री. सय्यद अहमद दायमी

☐ १२. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्ष ........................................ ६१
- सौ. जयश्री स्वामी

☐ १३. व्यथा सामान्यांच्या स्वातंत्र्याची ...................................................... ६६
- श्री. जनार्दन उमरगेकर

☐ १४. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतोत्सव - एक चिंतन ...................................... ७१
- प्रा. सुरेश गर्जे

# ४. स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि सामाजिक-आर्थिक न्यायाची घसरण...!

**प्रा. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
गडहिंग्लज जि. कोल्हापूर मो. ९८२२६५१३७७

**भा**रतीय स्वातंत्र्याची पंचाहत्तरी नुकतीच आपण साजरी केली. गेल्या ७५ वर्षांमध्ये अनेक क्षेत्रात सकारात्मक बदल झाले असले तरी, सामाजिक-आर्थिक न्यायाची घसरण मात्र थांबवता आली नाही. भारतीय समाजव्यवस्थेत सामाजिक-आर्थिक न्याय प्रस्थापित होणे हे राष्ट्राच्या आरोग्यासाठी आवश्यक असणारी गोष्ट आहे. कायदेशीरदृष्ट्या न्याय म्हणजे नैतिकदृष्टया, विवेकवादाने, नैसर्गिक दृष्टीने, निष्पक्षतेने आणि समतेने बरोबर अथवा योग्य असणे होय. तर आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीसाठी विकासाच्या संधीसाठी आधार तयार करणे, की ज्याव्दारे त्याला सर्जनशील, उत्पादक आणि प्रतिष्ठीत जीवन सुनिश्चित करणे शक्य होईल. आर्थिक न्याय हा केवळ आर्थिक नसतो, तर तो सामाजिक-आर्थिक या अनुषंगाने विचारात घ्यावा लागतो. माणूस हा समाजशील प्राणी आहे. न्याय आणि अन्याय या गोष्टी माणसांमध्ये दडलेल्या आहेत. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता आपल्या हाती असली पाहिजे असे माणसाला वाटते. त्यापेक्षाही जास्त तीव्रतेने अर्थसत्ता आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी त्याची धडपड असते.

शिकारी अथवा रानटी अवस्थेतील माणूस सुद्धा शिकार ही आपली संपत्ती असून तिचा जास्तीत-जास्त वाटा मला मिळाला पाहिजे, यासाठी संघर्ष करताना दिसतो. पशुपालन आणि शेतकी अवस्थेमध्ये तो प्राणी, कुरणे आणि जमिनीवर आपली मालकी प्रस्थापित करताना दिसतो. उद्योग आणि व्यापार अवस्थेत तो कारखान्याचा मालक बनून कामगारांचे शोषण करायला लागतो. यातूनच आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा अर्थात आहे रे आणि नाही रे वर्गाचा उदय होतो. गरीब कामगार अधिक गरीब तर श्रीमंत भांडवलदार अधिक श्रीमंत होत असतो. सामाजिक-आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी कार्ल मार्क्स आपला 'साम्यवादाचा जाहीरनामा' आणि 'भांडवल' नावाचा ग्रंथ जगातील कामगारांच्या हाती सोपवतो, हा सर्व घटनाक्रम युरोपमध्ये घडून येतो.

भारतीय समाजावर मात्र वैदिक ब्राम्हणी धर्माचा पगडा असल्यामुळे वर्ण आणि जाती व्यवस्थेचा वापर आर्थिक शोषणासाठी केला जातो. वर्ण आणि जातीव्यस्था ही